**नियमीत दिवाणी दावा क्र.४०४/२०२४ मधील निशाणी क्र.१६ वरील आदेश**

( CNR : MHAH250010692024 )

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचेविरुध्द झालेला विनाकैफियत आदेश रद्द होऊन प्रस्तुत अर्जासोबत दिलेली कैफियत अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे. सदर अर्जाचे पुष्ठ्यर्थ प्रतिवादी क्र.१ यांनी निशाणी क्र.१७ वर प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे.

२. सदर प्रतिवादीचे असे कथन आहे की, ते सदर दाव्यात हजर झाले आहे मात्र त्यांना कागदपत्रांची वेळेत पुर्तता न करता आल्याने त्यांच्याविरुध्द विना कैफीयत आदेश पारीत झाला. सदर प्रतिवादी प्रस्तुत अर्जासोबत कैफियत देत आहेत. परंतु त्यांचेविरोधात झालेला विनाकैफियत आदेश रद्द होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. तसे न झाल्यास सदर प्रतिवादीला नैसर्गिक न्यायापासून वंचित रहावे लागणार आहे. सबब, सदर प्रतिवादीने त्यांचेविरुध्द झालेला विनाकैफियत आदेश रद्द होऊन प्रस्तुत अर्जासोबत दिलेली कैफियत दाखल करण्यास परवानगी मागितली आहे.

३. वादींनी प्रस्तुत अर्जास म्हणणे देऊन असे कथन केले आहे की, अर्ज खरा नसुन त्यात दिलेले कारण खोटे आहे. प्रतिवादी क्र.१ यांना दि.२८.८.२०२४ रोजी नोटीस बजावणी झाली आहे. दाव्याचे कामकाज लांबवण्याचे उद्देशाने सदर प्रतिवादीने कैफीयत दिलेली नाही. वादी प्रत्येक तारखेस हजर असुन तो वयोवृध्द आहे व आजारी असतो. अर्ज नामंजुर करण्यात यावा. अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास जास्तीत जास्त दंडाचा आदेश व्हावा.

४. वादी व प्रतिवादी क्र.१ यांचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

५. वादीने सदरचा दावा प्रतिवादींच्या विरोधात अतिक्रमीत क्षेत्राचा ताबा मिळण्यासाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.१ यांना दि.२०.८.२०२४ रोजी समन्सची बजावणी झाली असुन ते दाव्यात दि.७.१०.२०२४ रोजी वकीलांमार्फत हजर झाले आहेत. त्यांच्याविरुध्द दि.१६.१२.२०२४ रोजी आदेश पारीत झालेला आहे. दाव्यातील कथनाचे अवलोकन करता असे दिसुन येते की, सदर दाव्यामध्ये पक्षकारांचे शेतजमीनींमधील मौल्यवान

अधिकार समाविष्ट आहेत. सदर प्रतिवादीने प्रस्तुत अर्जासोबत कैफियत दाखल केलेली आहे. सदर प्रतिवादीची कैफियत दाखल करुन न घेतल्यास त्यांचे अतोनात नुकसान होईल. तसेच प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेतल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही, उलट दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्यास मदत होणार आहे. प्रतिवादीने मुदतीत कैफियत न दिल्यामुळे वादीस झालेल्या त्रासाबद्दल वादींना रक्कम रु.२००/- इतका खर्च वादीस देणे न्यायोचित होईल. सबब, अर्जातील कथनांचा विचार करता नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ यांचेविरोधात दि.१६.१२.२०२४ रोजी झालेला आदेश त्यांनी रु.२००/- वादींना देण्याच्या अटीवर रद्द करण्यात येत आहे.

SHITAL CHANDRAKIRAN SALVI
Digitally signed by SHITAL CHANDRAKIRAN SALVI
Date: 2025.02.12 11:23:37 +0530

**( एस. सी. साळवी )**

**सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**पारनेर**

**दि. ११.०२.२०२५**
**पारनेर**